# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

विभागीय केंद्र, नागपूर – ४४० ००३

Tel : (0712) 2752929

Web :http://www.muhsfist.com, email: rc_nagpur@muhs.ac.in

## E-TENDER NOTICE NO. MUHS/FIST -25/01/2025

**E-Tender for Providing the Catering Service for**

**“First International Symposium on Tribal Health**

**MUHS FIST 25 “**

**“First International Symposium on Tribal Health**

**MUHS FIST 25 “** करीता

केटरींग सेवा घेणे करिताची ई–निविदा

## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, REGIONAL CENTRE, NAGPUR

### e-TENDER NOTICE NO. MUHS/FIST -25/01/2025

**e-Tender for Providing the Catering Services for "First International Symposium on Tribal Health MUHS FIST 25 "at Maharashtra University of Health Sciences, Regional Centre, Nagpur.**

**The details of e-Tender is as follows :-**

| Description of the Services | EMD Amount (In Rs.) | Cost of e-Tender Form |
|---|---|---|
| e-Tender for Providing the Catering Service for "First International Symposium on Tribal Health MUHS FIST 25 "of Maharashtra University of Health Sciences, Regional Centre, Nagpur. | 10,000/- DD in the name of MUHS FIST 2025 payble at SBI Sakkardara Nagpur | -------/- |

**e-Tender Time Table**

| | | |
|---|---|---|
| 1 | e-Tender Publishing Date | Date : 07 /01 /2025 Time : 18.00 hrs |
| 2 | Tender Sale / Download Start Date and Time | Date : 07 /01/2025 Time : 19.00 hrs |
| 3 | Bid Submission Start Date and Time | Date : 08/ 01 /2025 Time : 10.00 hrs |
| 4 | Closing Date and Time of e-Tender | Date : 14/01/2025 Time : 17.00 hrs |
| 5 | Date and place of Opening of Technical Bid | Date : 15/01/2025 Time : 14.00<br>"Maharashtra University of Health Sciences, Regional Centre, GMC Nagpur Campus, Nagpur - 440 003.<br>Tel : (0712) 2752929 |

# Index


| Sr. No. | Details | Contents | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | | ई-निविदारांसाठी मार्गदर्शक सूचना | 4 |
| 2 | | प्रस्तावना | 7 |
| 3 | | ई-निविदेबाबतची माहिती | 8 |
| 4 | | तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) | 12 |
| 5 | | इतर अटी आणि शर्ती | 13 |
| 6 | ANNEXURE – 'A' | तांत्रिक लिफाफ्यात कंत्राटदाराने सादर करावयाची कागदपत्रे | 16 |
| 7 | ANNEXURE – 'B' | खाद्यपदार्थांची यादी | 18 |
| 8 | ANNEXURE – 'C' | अन्न पदार्थाचा दर्जाच्या माहितीबाबतचा तक्ता | 20 |
| 9 | ANNEXURE – 'D' | निविदाधारक विषयी माहीती (कंपनीच्या लेटरहेडवर द्यावयाची) | 21 |
| 10 | ANNEXURE – 'E' | सीएचे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र | 22 |
| 11 | ANNEXURE – 'F' | हमीपत्र | 23 |
| 12 | ANNEXURE – 'G' | स्वयंघोषणापत्र | 24 |
| 13 | ANNEXURE – 'H' | Format For submitting Present Client List | 25 |

| | |
|---|---|
| 1 ) | **GUIDELINES TO BIDDER ON THE OPERATION OF ELECTRONIC TENDERING SYSTEM OF MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK.** |
| 1.1) | **BLANK TENDER FORMS**<br>Tender form can be downloaded from the website portal of First International Symposium on Tribal Health, MUHS Fist-25 of Maharashtra University of Health Sciences i.e www.muhsfist25.com after entering the details of payment towards fees as per the Tender Schedule. |
| 1.2) | The prospective tenderers are free to ask for any additional information or clarification either in writing or orally concerning the work, and the reply to the same will be given by the MUHS Regional Centre, Nagpur and Maharashtra University of Health Sciences, Nashik the same will be made available on e-tendering portal and this clarification referred to as common set of condition/deviations (C.S.D) shall form part of tender documents and which will also be common and applicable to all tenderers. |
| 1.3) | The tender submitted by the tenderer shall be based on the clarification and shall be unconditional. Conditional tenders will be summarily REJECTED. |
| 1.4) | All tenderers are cautioned that tenders containing any deviation from the contractual terms and conditions, specifications other requirements and conditional tenders will be treated as no responsive. |
| 2) | **PRE-REQUISITES TO PARTICIPATE IN THE TENDERS PROCESSED BY** |
| 2.1) | **ENROLMENT AND EMPANELMENT OF CONTRACTORS ON ELECTRONIC TENDERING SYSTEM**.<br>The contractors interested in participating in the Tenders of MUHS, Nashik process by using the Electronic Tendering System shall be required to enroll on http:/www.mahatenders.gov.in the Electronic Tendering System to obtain user ID. After submission of application for enrolment on the system, the application information shall be verified by the authorized representative of the service provider. If the information is found to be complete, the enrollment submitted by the process of enrollment either from Helpdesk Support team on enroll directly on web site http:/www.mahatenders.gov.in. |
| 2.2) | **OBTAINING A DIGITAL CERTIFICATE**<br>The digital certificate is issued by an approved Certifying Authority Authorized by the Controller of Certifying Authorities of Government of India through their |

| | |
|---|---|
| | Authorized Representatives upon receipt of documents required to obtain a Digital Certificate. Bid data/ information for a particular Tender may be submitted only using the Digital Certificate which is used to encrypt the data during the Bid preparation. In case, during the process of preparing and submitting a Bid for a particular tender, the contractor loses his/her Digital Signature Certificate (i.e. due to virus attack, hardware problem, operating system problem); he/she may not be able to submit the Bid online. Hence, the users are advised to store his/her Digital Certificate secure and if possible, keep a backup at safe place under adequate security to be used in case of need. In case of online tendering, if the Digital Certificate issued to an Authorized User of a partnership firm is used for signing and submitting a bid, it will be considered equivalent to a no objection certificate/power of attorney to that user to submit the bid on behalf of the partnership Firm. The partnership firm has to authorize a specific individual by an authorization certificate signed by a partner of the firm (and in case the applicant is a partner, another partner is required to authorize in the same form) to use the digital certificate as per Indian Information Technology Act, 2000.<br>Unless the Digital Certificate is revoked, it will be assumed to represent adequate authority of the Authorized user to bid on behalf of the firm for the tenders processed on the Electronic Tender Management System of Government of Maharashtra as per Indian Information Technology Act 2000. The Digital signature of this authorized user will be binding on the firm. It shall be the responsibility of partners of the firm to inform the certifying authority or sub-certifying authority, if the Authorized user changes, apply for a fresh Digital Signature Certificate. The procedure for application of a Digital Signature Certificate will remain the same for the new authorized user.<br>The same procedure holds true for the Authorised Users in a Private/Public Limited Company. In the case, the authorization Certificate will have to be signed by the Director of the Company or the reporting authority of the applicat. For information of the process of application for obtaining Digital Certificate, the contractors may visit the section 'Digital Certificate' on the home page of the electronic tendering system. |
| **2.3)** | To operate on the electronic tendering system of government of Maharashtra, the computer system of the contractors is required be set up. The contractors are required to install utilities available under the section mandatory installation components on the home page of the system. The utilities are available for download freely from the above mentioned section. The contractors are requested to refer to |

| | |
|---|---|
| | the e- Tendering toolkit for Bidders available online on the home page to understand the process of setting up the system, or alternatively, contract the helpdesk support team on information/guidance on the process of setting up the system. |
| **3)** | **STEPS TO BE FOLLOWED BY CONTRACTORS TO PARTICIPATE IN THE e-TENDERS PROCESSED BY MAHATENDERS** |
| **3.1)** | **PREPARATION OF ONLINE BRIEFCASE**<br>All contractors enrolled on the Electronic Tendering System of Government of Maharashtra are provided with dedicated briefcase facility to store documents / files in digital format. The contractors can use the online briefcase before starting the Bid Preparation and submission stage. In Case, the contractors have multiple documents under the same type (e.g. multiple work completion certificates) as mentioned above, the contractors advised to either create a single pdf file of all the documents of same type or compress the documents in a single compressed file in zip or rar formats and upload the same. It is mandatory to upload the documents using the briefcase facility. Therefore, the contractors are advised to keep the documents ready in the briefcase to ensure timely bid preparation.<br>**Note:** Uploading of documents in the briefcase does not mean that the documents are available to Regional Centre, Nagpur, Maharashtra University of Health Sciences, Nashik at the time of tender opening stage unless the documents are specifically attached to the bid during the online bid preparations as well as during decryption. |
| **3.2)** | **ONLINE VIEWING OF DETAILED NOTICE INVITING TENDERS**<br>The contractors can view the detailed tender notice along with the time schedule (key Dates) for all the live tenders released by Maharashtra University of Health Sciences, Regional Center Nagpur on the e-Tendering portal on www.muhsfist25.com in under the organization of Maharashtra University of Health Sciences, Nashik. |

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, विभागीय केंद्र, नागपूर – ४४० ००३ येथे "First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25" करीता केटरींग सेवा पुरविण्याबाबतची ई-निविदा

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे एक राज्यस्तरीय विद्यापीठ असून त्याचे विभागीय केंद्र नागपूर येथे आहे. सदर विभागीय केंद्रामार्फत ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर च्या आवारात दि. ३१ जानेवारी २०२५ ते ०२ फेब्रुवारी २०२५ रोजीपर्यत **"First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25"** या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिसंवादाकरीता महाराष्ट्र राज्यातून, देशातून व परदेशातून व्याख्याते, व पाहूणे सहभागी होणार असून सदर अंदाजे १००० अभ्यांगतांसाठी वरील तारखेप्रमाणे अंदाजे तीन दिवस सकाळी चहा व अल्पोपहार, दुपारी जेवण, सायंकाळी चहा व अल्पोपहार अशा वेळापत्रकाप्रमाणे, तसेच आवश्यक वेळी चहा याप्रमाणे अन्न पदार्थ पुरवठा करण्याकरीता विविध केटरींग सर्व्हिसेस/पुरवठेदारांकडून पुरवठयाचे दर मागविण्यात येत आहे. त्यासाठी पुरवठेदारास ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूरच्या आवारात स्वयंपाकारीता जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. पुरवठेदाराने सेवा पुरवितांना अन्नाची व सेवेची गुणवत्ता, स्वच्छता आणि इतर सर्व सेवांमध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही प्रकारची कमतरता न करता सातत्याने उच्च दर्जाची व ३-स्टार दर्जाच्या सुविधांच्या समतुल्य सेवा पुरविणे आवश्यक आहे. राष्ट्रीय / स्थानिक स्तरावरील समतुल्य संस्था किंवा सामुहिक मोठया प्रमाणावर सेवा पुरविल्याचा पुर्वानुभव असणे आवश्यक आहे.

करीता, **"First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25"** साठी केटरींग सेवा घेणे /पुरवठा करणे साठी विविध पुरवठेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर महोत्सवासाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्थेसाठीच्या स्वयंपाक कामाकरीता लागणारी इतर सर्व आवश्यक कच्चामाल, यंत्रसामुग्री व उपकरणे पुरवठेदाराने आणावयाचे आहे. पुरवठेदाराने अल्पोपहार व भोजनासाठी उत्तम दर्जाचे चविष्ट अन्नपदार्थ पुरविणे आवश्यक आहे. त्याकरिता लागणारे अन्नधान्य व वाढपी (केटरींग सेवा) पुरवठेदाराने आणणे आवश्यक आहे.

सदर परिसंवादासाठी येणाऱ्या अभ्यांगतांची संख्या कमी-जास्त होणार असल्याकारणाने व्यक्तींच्या संख्येप्रमाणे करावयाच्या व्यवस्थेबाबत आपणास पुर्व कल्पना दिली जाईल. त्याप्रमाणे अल्पोपहार व भोजन व्यवस्थाकरणे बंधनकारक असेल.

# ई-निविदेबाबतची माहिती

**“First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25 “** करीता केटरींग सेवा पुरविणे बाबत, "चेअर प्रोफेसर तथा आयोजन सचिव एमयुएचएस फिस्ट २५" यांचे नावे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा www.muhsfist25.com या संकेतस्थळावरुन दाखल करता येईल. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती व अटी व शर्ती www.muhsfist25.com संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

निविदा सूचनेतील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

| निविदेच्या अटी व शर्ती :- | |
|---|---|
| १) | प्रत्येक निविदा दोन स्वतंत्र लिफाफ्यात (Bids) सादर करावी. |
| २) | (अ) तांत्रिक निविदेचा लिफाफा (Technical Bid)<br>(ब) व्यापारी दरांचा लिफाफा **(**BOQ**)**<br>तांत्रिक निविदेचा लिफाफा (Technical Bid) मध्ये ई-निविदेत नमूद दस्तावेज सादर करण्यात यावेत. सदर लिफाफयात वस्तूचे दर नमूद करु नयेत. व्यापारी दरांचा लिफाफा (BOQ) मध्येच दर नमूद केलेले असावेत. अन्यथा अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. |
| ३) | ज्या सेवापुरवठादारांना ई-निविदा दाखल करण्याअगोदर ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर च्या आवारातील भोजनव्यवस्थेची जागा पहावयाची असल्यास त्यांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सकाळी १०:३० ते सायं.५:३० पर्यत) पाहता येईल. |
| ४) | सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी तांत्रिक लिफाफा उघडण्यात येऊन निविदेत नमुद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केले आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल. आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. केवळ तांत्रिक तपासणीत पात्र ठरलेल्या ई-निविदादारांचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील. |
| ५) | ई-निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार, मआविवि विभागीय केंद्र, नागपूर यांना राहतील. |
| ६) | निविदेसाठी होणारा खर्च निविदाधारकाने करावयाचा आहे. |
| ७) | निविदाकारांचे अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) नुसार केले जाईल. त्यामध्ये किमान ६० गुण प्राप्त करणारा निविदाधारक पुढील निविदा प्रक्रियेस पात्र ठरेल. अशाप्रकारे किमान ६० गुण अर्जित करणाऱ्या केवळ तांत्रिक दृष्टया पात्र निविदादारांच्या दरांबाबतचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल. |
| ८) | दरांबाबतचा लिफाफा उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा च्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांची, विद्यापीठामार्फत नियुक्त केलेल्या समितीमार्फत तांत्रिक अर्हता मुल्यमापन संबंधित सर्व मुळ कागदपत्रे तपासली जातील. सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी |

| | |
|---|---|
| | दाखविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. |
| ९) | तांत्रिक दृष्टया पात्र ठरणाऱ्या निविदांचे लिफाफे निविदेत दिलेल्या अटीनुसार **QCBS** (Quality Cost Based Selection) पध्दतीने पार पाडण्यात येणार आहे. |
| १०) | निविदा भरण्यापूर्वी निविदाकाराने **"First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25 "** नियोजीत भोजन व्यवस्था व स्वयंपाक स्थळाची पाहणी करावी. |
| ११) | स्वीकृत पुरवठेदाराचे "**BOQ**" मध्ये नमूद केलेले दर हे पुरवठा आदेश/दरकराराच्या दिनांकापासून पुढील सहामहिन्याच्या कालावधीसाठी बंधनकारक राहतील. सदर दरांनुसार उक्त कालावधीदरम्यान विद्यापीठ संबंधीत ठेकेदारास पुरवठा आदेश देवू शकेल. |
| १२) | "**BOQ**" मध्ये दर सादर करतांना यादीतील अन्नपदार्थांच्या बाजारभावानुसार असलेल्या दरांचा उल्लेख करावा. सादर केलेले दर हे वाहतूक, वस्तू व सेवाकर (GST) इ. सह असावेत. मआविवि विभागीय केंद्र, नागपूर मार्फत कोणतेही अतिरिक्त कर देय असणार नाहीत, याची निविदाधारकाने नोंद घ्यावी. |
| १३) | न्यूनतम दरांची ई-निविदा स्विकारणे मआविवि विभागीय केंद्र, नागपूर बंधनकारक राहणार नाही. तसेच, एक अथवा सर्वच ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मआविवि विभागीय केंद्र, नागपूर ने राखुन ठेवला आहे. अनुभव व खाद्यपदार्थाचा दर्जा यानुसार केवळ योग्य ती निविदा स्विकारली जाईल. |
| १४) | सदर केटरींग सेवे करीता जमा केलेल्या अनामत रक्कम (EMD) सेवा निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. सदर अनामत रकमेवर व्याज मिळणार नाही. पुरवठा आदेश स्विकारल्यानंतर पुरवठेदाराने केटरींग सेवा देण्यास असमर्थता दर्शविल्यास स्विकृत पुरवठेदाराची अनामत रक्कम (EMD) दंड म्हणुन विद्यापीठ खाती जमा (Forfeit) करण्यात येईल. अपात्र पुरवठादारांची अनामत रक्कम (EMD) निविदा प्रक्रिया झाल्यानंतर एक महिन्यात परत करण्यात येईल. |
| १५) | **"First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25 "** करीता अल्पोपहार व भोजन व्यवस्थेसाठीची वेळ सकाळी ७.०० ते रात्री ९.३० वाजेपर्यंत असेल. |
| १६) | **"First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25 "** करीता अल्पोपहार व भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी पुरवठेदाराने किमान सहा/आठ (आवश्यकतेप्रमाणे) सुशोभित (३ तारांकीत दर्जाचे) काउंटर्स लावणे आवश्यक राहील. तसेच, भोजन व्यवस्थेकरीता स्वच्छ व सुशोभित असलेली क्रॉकरी साहित्य पुरविणे आवश्यक असेल. |
| १७) | ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्सच्या आवारात उपलब्ध होणारे पाणी काळजीपुर्वक वापर करणे अपेक्षित आहे. तसेच भोजन व्यवस्थेचा परिसराची स्वच्छता ठेवणे, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्सच्या कुठल्याही इमारतीच्या मालमत्तेस क्षती पोहोचनार नाही किंवा ती खराब होणार नाही याची सर्वस्वी काळजी पुरवठादाराने घेणे आवश्यक आहे. ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्सचा परिसर प्लॅस्टिकमुक्त ठेवण्याचे दृष्टीने सर्वातोपरी उपाययोजना करणे पुरवठादारास बंधनकारक असेल. |
| १८) | पुरवठेदारास ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स परिसरात कोणत्याही |

| | |
|---|---|
| | बेकायदेशीर वस्तू, गुटखा/ सिगारेट/ पान मसाला/अंमली पदार्थ/ अंमली पेय/मद्य /युज ॲन्ड थ्रो प्लास्टिकच्या बाटल्या किंवा इतर सामुग्री इत्यादी, तसेच कायद्याने निर्बंध असलेले पदार्थ / वस्तु यांची साठवणूक अथवा विक्री करता येणार नाही किंवा कायदयाने वर्जित असलेल्या कुठल्याही बाबी करता येणार नाही. |
| १९) | विद्यापीठ प्रशासनास केटरींग व्यवस्थेतील खाद्यपदार्थांचे, खाद्यसामग्रीचे निरीक्षण/ तपासणी, जागेची स्वच्छता इ. च्या दर्जा बाबत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार असतील. अशाप्रकारच्या तपासणीत करारातील कुठल्याही अटींचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास देयकात / अनामत रक्कमेत कपात करण्याचे अधिकार विद्यापीठास राहिल. |
| २०) | भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी अग्नी प्रतिबंध उपाययोजना अतिरिक्त स्वरुपात सुध्दा पुरवठेदाराने करावी. |
| २१) | स्वयंपाक करणारी आचारी, वाढपी, कामगार यांची आवश्यकता वाटल्यास आरोग्य तपासणी करुन घेण्याची जबाबदारी पुरवठादाराची असेल. |
| २२) | पुरवठेदाराने दिर्घ किंवा संसर्गजन्य आजार असलेल्या व्यक्तींना कामकारीता नेमू नये. |
| <u>दैनंदिन कामाच्या अटी व शर्ती:-</u> | |
| २३) | स्वयंपाकासाठी लागणारा कोणताही किराणा माल (उदा. डाळी, धान्य, शेंगदाणे, पीठ, तेल इ.) उघडयावर ठेवू नयेत. प्रत्येक वस्तु ठेवण्यासाठी व्यवस्थित बंद होईल असे झाकण असलेल्या डब्यांचा वापर करावा. |
| २४) | स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे खाद्यसामग्री निर्भेळ असावी. भेसळयुक्त नसावी. स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे खाद्यतेल व वनस्पती तुप / शुध्दतुप, मसाले व इतर खादयसामग्री "ॲगमार्क" प्रमााणित असावी. कोणतेही खाद्य/अन्न पदार्थ उघडयावर ठेवू नयेत. |
| २५) | एका सत्राकरीता बनविलेले खादयपदार्थ दुसऱ्या सत्रात वापरु नये. शिळे अन्न पदार्थाची योग्य विल्हेवाट लावावी. असे अन्नपदार्थ ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स आवारात इतरत्र फेकू नये. |
| २६) | वापरण्यात येणारे शीतकपाट, मिक्सर इ. वीजेवरील उपकरणांची देखभाल व स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी पुरवठेदाराची राहील. |
| २७) | स्वयंपाकाची भांडी स्वच्छ असावीत, आरोग्यास बाधा उत्पन्न करणारी नसावीत. |
| २८) | स्वयंपाक करणारी माणसे, वाढपी, कामगार निरोगी असावेत, त्यांना संसर्गजन्य आजार/रोग नसावेत. त्यांची आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागेल. वैद्यकीय तपासणी मध्ये कामगार बाधीत आढळल्यास त्यांना कामावर ठेवता येणारा नाही. |
| २९) | १८ वर्षाखालील कामगारांना कामाकरीता ठेवता येणार नाही. आवश्यकता असल्यास कामगारांची संपुर्ण वैय्यक्तीक माहिती निवासी पत्ता व फोटोसह पुरवठेदाराकडे असणे आवश्यक असेल. |
| ३०) | पुरवठादाराने आचारी, वाढपी व इतर कर्मचारी यांनी कामाच्या वेळेस स्वच्छ व समान पोशाख, हेअरकॅप व हॅन्डग्लोज परिधान करणे आवश्यक असेल. कार्यक्रमाच्या ठिकाणी दिलेल्या व्यक्तीच्या संख्येच्या योग्य प्रमाणात वाढपी (waiter) व कर्मचारी नेमण्यात यावेत. |

| | |
|---|---|
| ३१) | स्वयंपाकासाठी लागणारे इंधन (गॅस) व गॅस शेगडी, मिक्सर / मळणीयंत्र इ. अनुषंगीक यंत्र सामग्री ची व्यवस्था पुरवठादारानेच करावी. इंधन, गॅससिलेंडर आणि त्यापासून उद्भवणाऱ्या सर्व धोक्यांची जबाबदारी पुरवठेदारावर राहील. त्याच्या देखभालीची तसेच सुरक्षित कामकाजाचीही पुर्ण जबाबदारी पुरवठेदारावर राहील. |
| ३२) | स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे खाद्यपदार्थ किंवा ते बनविण्यासाठी लागणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे आढळुन आल्यास किंवा अशा मुळे कर्मचारी किंवा अभ्यांगतांना बाधा झाली असे सिध्द झाल्यास विद्यापीठ प्रशासनाकडून पुरवठेदाराची सेवा स्थगित करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याविरोधात योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील. |
| ३३) | विद्यापीठ कार्यालयाने ठरवुन दिलेल्या जागेवर विद्यापीठ कर्मचारी व अभ्यागतांना खाद्यपदार्थ पुरवावे लागतील. अल्पोपहारसाठी व भोजनासाठी ठरवुन दिलेल्या जागेचाच वापर करावा लागेल. कार्यक्रमाच्या ठिकाणी / इमारतीमध्ये अतिरिक्त काऊंटर तयार करुन चहा व नाश्ताची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. |
| ३४) | भोजन व्यवस्थेच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी पुरवठेदाराची असेल. अल्पोपहार व भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी व विद्यापीठाने आदेशीत केलेल्या ठिकाणी दिवसभर स्वच्छ व निर्जतुंक पिण्याचे पाणी व कागदी ग्लास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठेदाराची असेल. |
| ३५) | निविदाधरकाच्या आचारी, वाढपी व इ. कामगारांच्या वेतन/मजुरी आणि सुरक्षिततेची सर्व जबाबदारी पुरवठेदाराची असेल. कामगारांबाबत कामगार कायदयातील तरतुदी नुसारची सर्व जबाबदारी सर्वस्वी पुरवठेदाराची असेल. |
| ३६) | स्वयंपाक करताना अपघात झाल्यास त्यास पुरवठादार स्वतः जबाबदार असेल, त्याबाबत विद्यापीठाकडुन नुकसान भरपाई मिळणार नाही. ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स च्या आवारात अशा अपघातामुळे ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्से नुकसान झाल्यास अथवा विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यास/अभ्यांगतास दुखापत झाल्यास त्याची देखील सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची असेल व त्याची भरपाई करण्यास पुरवठादार जबाबदार असेल. |
| <u>न्याय कक्षा</u> | |
| ३७) | निविदेबाबत / पुरवठयाबाबत कोणत्याही स्वरुपाचे वाद, कायदेशीर मुद्दे अथवा अडचणी उत्पन्न झाल्यास त्याबाबीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या मा. कुलगुरु यांना राहतील आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील. |
| ३८) | निविदेबाबत निर्माण होणारी कोणतीही कायदाविषयक बाब अथवा दावा नागपूर जिल्हा न्यायालयाशिवाय इतर कोणत्याही कोर्टाच्या न्यायकक्षेत येणार नाही. |
| ३९) | सदर ई-निविदा प्रक्रिया ही ई-निविदेच्या कोणत्याही स्तरावर पूर्वसूचनेशिवाय रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासनास राहील. |
| ४०) | सदर कामासाठी ई.निविदा सादर करणारे पुरवठादार हे नागपुर शहरामधीलच असावे. |

## तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब)

| अ. क्र. | तांत्रिक बाब | किमान व कमाल | गुण | जास्तीत जास्त गुण |
|---|---|---|---|---|
| १. | कॅटरिंग व्यवस्था संबंधित सेवा पुरविलेबाबत ज्या संस्थेमध्ये सेवा पुरविली असेल त्या संस्थेमध्ये भोजनासाठी व्यक्तीची संख्या (सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ यापैकी कोणत्याही एक वर्ष) | २०० ते ५०० पर्यंत | १० | २० |
| | | ५०१ ते १००० पर्यंत | १५ | |
| | | १००० च्या पुढे | २० | |
| २. | कॅटरिंग/ हॉटेल व्यवसायाचा अनुभव (तांत्रिक लिफाफ्यातील अनुक्रमांक एक नुसार दाखला आवश्यक) | १ ते २ वर्ष | ०५ | १५ |
| | | २ ते ३ वर्ष | १० | |
| | | ३ वर्षावरील | १५ | |
| | | | | |
| | | | | |
| ३. | कॅटरिंग व्यवस्था संबंधित सेवा पुरविण्यासाठी वार्षिक उलाढाल. | १ ते ५ लाख | ०५ | १५ |
| | | ५ ते १० लाख | १० | |
| | | १० लाख च्या पुढे | १५ | |
| | | | | |
| | | | | |
| ४. | नागपूर महानगरपालिका क्षेत्रात निविदाकाराचे कार्यालय / शाखा | असल्यास | ०५ | ०५ |
| | | नसल्यास | ०० | |
| ५. | निविदाकार सध्या जेथे उपहारगृह/केटरींग सेवा चालवित/दित आहेत त्या कोणत्याही एका ठिकाणा ची विद्यापीठ गठीत समितीव्दारे पाहणी करुन देण्यात येणारे गुण | | | ३० |
| | एकुण गुण | | | १०० |

| | |
|---|---|
| १ | किमान ६० गुण प्राप्त करणारा निविदाधारक पुढील निविदा प्रक्रियेसाठी पात्र ठरेल. |
| ०२ | तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर निविदाकाराने निविदा सोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या मूळ प्रती विद्यापीठामार्फत गठीत केलेल्या भोजन व्यवस्था समिती/छाननी समितीस दाखविणे आवश्यक आहे आणि सदर समितीचा निर्णय स्विकारणे निविदाकारास बंधनकारक राहील. |
| ०३ | अल्पोपहार व भोजन व्यवस्थेच्या निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक व दरांचे मूल्यांकनासाठीचे गुणोत्तर प्रमाण ६०:४० असे असेल. तांत्रिक मूल्यांकनामध्ये पात्र होण्यासाठी तांत्रिक गुणपत्रातील १०० पैकी निविदाकाराला तांत्रिक पात्रतेसाठी किमान ६० गुण प्राप्त करणे आवश्यक राहतील. किमान ६० गुण अर्जित करणारे निविदाकार पुढील प्रक्रियेसाठी पात्र होतील व त्याचे दरांचे लिफाफा २ मधील दराचे वरीलप्रमाणे पृथःकरण करण्यात येईल. |
| ०४) | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथील **“First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25 “** करीता वस्तु व सेवा करासह दर मागविण्यात येत आहेत. निविदादारांनी त्याचा विचार करुन व्यापारी दरांचा लिफाफा (BOQ) मध्येच दर नमूद करावेत. |
| | |

| | |
|---|---|
| | इतर अटी व शर्ती :- |
| ०१) | पुरवठेदाराचा प्रत्येक वाढपी (वेटर) कर्मचारी हा गणवेश, शुज आणि हात मोजे टोपी, हेअरमास्क, माऊथमास्क, इ. परिधान केलेला असावा. गणवेश परिधान न केल्यास प्रत्येकी रु.१,०००/- इतका प्रतिदिन दंड पुरवठेदाराकडून आकारण्यात येईल किंवा देयकातून वजा करण्यात येईल. |
| ०२) | स्वयंपाकासाठी लागणारे स्वच्छ पाण्याची व्यवस्था पुरवठेदाराने स्वतः करावी. |
| ०३) | उरलेले पदार्थ/ शिळे अन्न / खरकटे व इतर ओला कचरा, इतर कचरा ब्लॅक प्लास्टिक डिसपोझेबल बॅग मध्ये बंद करुन त्याची विल्हेवाट ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्सच्या इमारतीच्या आवाराबाहेर करण्याची जबाबदारी संपूर्णपणे पुरवठेदाराची राहील. ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्सच्या आवाराबाहेर कचऱ्याची विल्हेवाट लावताना महानगरपालिकेकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार उद्‌भवल्यास त्याचे निराकारण करण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदाराची असेल. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न केल्याचे आढळल्यास प्रत्येक वेळी रु.१,०००/- दंड देयकातून कपात करण्यात येईल. |
| ०४) | भोजन व्यवस्थेबाबत लागणारे केंद्र शासन, राज्य शासन, स्थानिक संस्थाचे कर, परवाने फी, इत्यादी घेण्याची जबाबदारी पुरवठेदाराची असेल. याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व विभागीय केंद्र जबाबदार राहणार नाही. |
| ०५) | पुरवठेदाराकडे केटरींग सेवा चालविण्यासाठी अन्न व औषध सुरक्षा प्रशासन, महाराष्ट्र शासन (Food and Drug Safety) यांचा परवाना तसेच नियमाप्रमाणे आवश्यक असलेले महानगरपालिकेचे सर्व परवाने असणे आवश्यक आहे. |
| ०६) | आवश्यकतेनुसार पुरवठेदाराला संबंधित समितीकडून मेनु आगाऊ तयार करुन देण्यात येईल. मेनू मध्ये बदल झाल्यास संबंधित भोजन व्यवस्था समितीची परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच मेन्युमध्ये दिलेल्या अन्नपदार्थांच्या दर्जाचा **ANNEXURE-E** नुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील. त्यानुसार भाज्या व इतर पदार्थ इत्यादी सर्व ताजे व स्वच्छ स्वरुपातील पदार्थ रोजच्या रोज खरेदी करुन वापरणे बंधनकारक राहील. सर्व भोजन सामुग्रीची तपासणी तज्ञ समितीमार्फत कार्यक्रमा/पुरवठया दरम्यान करण्यात येईल. |
| ०७) | पॅकिंगमध्ये भोजन पुरवठा करणेबाबत सुचित केल्यास त्याप्रमाणे कंत्राटदार यांनी व्यवस्था करणे आवश्यक राहील. पॅकिंग साहित्यासाठी लागणार खर्च कंत्राटदारास करावा लागेल. |
| ०८) | मआविवि विभागीय केंद्र, नागपूर यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पुरवठेदारास पालन करावे लागेल. भोजन व्यवस्थेच्या दैनंदिन कार्यव्यवस्थेवर विद्यापीठाच्या संबंधित समितीची देखरेख राहील. |
| ०९) | निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा पुरवठेदाराकडुन भंग होत असल्यास प्रत्येक वेळी प्रत्येक बाबीसाठी व अटी भंगाच्या प्रत्येक वेळेसाठी रु.२,०००/- पर्यंत देयकातून वजा करण्यात येईल. |
| १०) | या निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा/कराराच्या एखाद्या कलमाच्या अर्थविषयी शंका |

| | |
|---|---|
| | किंवा वाद उपस्थित झाल्यास कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा निर्णय अंतिम राहील आणि तो सर्वावर बंधनकारक राहील. |
| ११) | निविदा कोणत्याही टप्प्यावर रदद करणे अथवा अंतिमतःस्विकारण्याचा निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे. |
| १२) | या करारास नागपूर शहरापुरतेच न्यायाधिकार कक्ष (Legal Jusrisdiction) मर्यादित राहील. |
| १३) | कोणत्याही कारणास्तव निविदाधारकाचे काम काढुन घेण्यात आले व जर नविन पुरवठेदाराकडुन करार कालावधीत काम करुन घ्यावे लागले तर अशा वाढीव खर्चाची भरपाई पुरवठेदाराच्या अनामत रक्कमेतुन वसुल करण्यात येईल. |
| १४) | या करारान्वये सोपविण्यात आलेले भोजन व्यवस्थेचे काम निविदा धारकास इतर कोणत्याही पुरवठेदाराकडे अथवा एजन्सीकडे हस्तांतरीत करता येणार नाही वा सोपविता येणार नाही किंवा सब-कॉन्ट्रक्ट देता येणार नाही. |
| १५) | सदर करारान्वये सोपविण्यात आलेल्या कामासाठी कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यास कोणतेही दुर्घटना, अपघात अथवा दुखापत झाल्यास त्याची व त्यापोटी होणाऱ्या नुकसान भरपाईबाबत सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल. यासाठी कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यास आवश्यक ते विमा संरक्षण देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल व या संदर्भात कोणत्याही प्रकारची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व विभागीय केंद्र, नागपूर यांची राहणार नाही. तसेच कंत्राटदारामार्फत पुरविण्यात आलेल्या अयोग्य भोजन व्यवस्थेमुळे विद्यार्थी, अधिकारी/कर्मचारी किंवा अभ्यागतांना कुठल्याही प्रकारचे आजारपण, दुर्घटना, अपघात अथवा दुखापत झाल्यास त्याची व त्यापोटी होणाऱ्या नुकसान भरपाईबाबची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल. |
| १६) | असमाधानकारक सेवेच्या बाबी,<br>१. पदार्थांची गुणवत्ता योग्य दर्जाची नसणे.<br>२. आरोग्य विभागाच्या तपासणीनुसार पदार्थांमध्ये भेसळ आढळणे.<br>३. वेळेवर जेवण/ भोजन सुविधा न पुरविणे.<br>४. वाढपी कर्मचारी संख्या भोजनार्थींच्या प्रमाणापेक्षा कमी असणे.<br>५. गणवेश, ग्लोव्हज, हेड कॅप इ. परिधान केलेले नसणे.<br>६. स्वयंपाकगृह स्वच्छ न राहणे.<br>७. कर्मचाऱ्यांची स्वतःची स्वच्छता न पाळणे.<br>८. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाचा अभाव. |
| १७) | व्यापारी दरांचा लिफाफा (BOQ) उघडण्याच्या तारखेपासून निविदा स्विकृत करण्याचा कालावधी १० दिवस राहील. |
| १८) | निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची अनामत/बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १९) | पुरवठेदारास अल्पोपहार, दुपारचे भोजन, सायंकाळचे चहा व नाष्टा आवश्यकतेनुसार |

| | |
|---|---|
| | पॅकिंगमध्ये व बुफे स्वरुपात पुरविणे बंधनकारक राहिल. |
| २०) | कोणत्याही संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर सर्व कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय तपासणी करणे बंधनकारक आहे. |
| २१) | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व विभागीय केंद्र, नागपूर यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे व अटी व शर्तींचे पालन करणे निविदादारास बंधनकारक राहिल. |
| २२) | निविदादाराने नमुद केलेले दर हे आदेश दिलेल्या/कार्य केलेल्या तारखेपासून सहा महिन्यांकरिता राहतील. यामध्ये जरी स्वयंपाकाच्या वस्तुंचे दर वाढले तरी कोणत्याही प्रकारची वाढ दिली जाणार नाही. |
| २३) | या निविदेच्या अटींनुसार जबाबदाऱ्या नीट पार पाडल्या पाहिजेत आणि पाळल्या गेल्या पाहिजेत याची जबाबदारी निविदादाराची असेल. |
| २४) | सदर कामासाठी ई.निविदा सादर करणारे पुरवठादार हे नागपुर शहरामधीलच असावे. |

# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

## ANNEXURE – 'A'

तांत्रिक लिफाफ्यात (**Technical Bid**) कंत्राटदाराने सादर करावयाची कागदपत्रे

| अ. क्र. | कागदपत्राचे नाव | सहपत्र क्रमांक व पृष्ठ क्रमांक नमुद करावा |
|---|---|---|
| १. | पुरवठेदार हा केटरींग क्षेत्रातील व्यावसायिक असावा. किमान १००० ते २००० व्यक्तींसाठी शाकाहारी भोजन व्यवस्था (प्रतिष्ठित प्रशिक्षण संस्था किंवा समान दर्जाची आस्थापना, केंद्रशासकीय/ निमशासकीय /राष्ट्रीय स्तरावरील समतुल्य संस्था किंवा बहुराष्ट्रीय संस्था/ कंपन्यां/ हॉटेलमध्ये सेवा पुरविल्याचा त्याला किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.<br>सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ यापैकी कोणतीही वर्षात सदर पुरवठेदाराने वरील नमुद केलेल्या विविध संस्था व कार्यालय, हॉटेल्समध्ये कॅटरींग सर्व्हिसेस (म्हणजे - शाकाहारी, महाराष्ट्रीयन, दक्षिण भारतीय, उत्तर भारतीय, चायनीज, आशियायी. इ. ) अल्पोपहार व भोजन व्यवस्था पुरविण्याचा किंवा हॉटेल चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. या अनुभवाचे सुस्पष्ट/ तपशिलवार अद्ययावत अनुभव प्रमाणपत्रे/दाखले जोडावीत. | |
| २. | अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र शासन यांच्या अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अंतर्गत (Food and Drug Administration, Maharashtra State, FSSAI Certification) परवाना असणे बंधनकारक राहील. | |
| ३. | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र / Self Declaration | |
| ४. | एजन्सी/ कंपनीची माहीती (Format given as Annexure – K)<br>● मालकाचे नाव (Proprietor)<br>● भागीदारी असल्यास भागीदाराची नावे व भागीदाराचा करार नोंदविल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>● कंपनी असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र<br>● कंपनी / कार्यालयाचा पत्ता व फोन नंबर, मोबाईल फोन नंबर, फॅक्स नंबर, ई-मेल.<br>● प्राधिकृत व्याक्तींची नावे व स्वाक्षरीसह समक्ष प्राधिकाऱ्याने दिलेले प्राधिकारपत्र. | |
| ५. | सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षापैकी कोणत्याही वर्षाची कॅटरिंग उद्योगाची वार्षिक उलाढाल प्रत्येकी किमान रु. ५ लाख असल्याबद्दलचे सी.ए.चे प्रमाणपत्र असणे आवश्यक. (Format given as ANNEXURE - L) | |
| ६. | GST नोंदणी प्रमाणपत्र व मागील तीन महिन्यांचा GST भरल्याची पावती. | |
| ७. | PAN/TAN/TIN No. नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ८. | एजन्सी/ कंपनीला कोणत्याही केंद्रसरकार/ राज्य सरकार कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा मंत्रालय / विभाग / कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांद्वारे त्यांचा काळया यादीमध्ये समावेश केले नसल्याचे तसेच एजन्सी / कंपनी विरोधात कोठल्याही प्रकारची पोलीस केस नसल्याचे व कोणत्याही न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र एजन्सी / फर्मच्या लेटरहेडवर देणे बंधनकारक राहील. (Format given as Annexure - M) | |
| ११. | बयाना रक्कम रुपये 10,000/- (EMD) भरल्याची पावती जोडणे आवश्यक | |

| अ. क्र. | कागदपत्राचे नाव | सहपत्र क्रमांक व पृष्ठ क्रमांक नमुद करावा |
|---|---|---|
| | आहे. | |
| १२. | सन २०२३–२४ वर्षाचा आयकर भरल्याचा पुरावा जोडावा (लागू असल्यास) | |
| १३. | अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वयंघोषणापत्र( Format given as Annexure-N ) | |
| १४. | कॅटरिंग व्यवस्था संबंधित सेवा पुरविल्याबाबत तांत्रिक लिफाफ्यातील अ. क्र. एक येथील समकक्ष संस्थांमध्ये कॅटरिंग विषयी सेवा पुरविण्यासाठी असलेली कर्मचारी संख्या दर्शविणारा तक्ता तसेच नियमानुसार लागु असल्यास त्यांची EPF संबंधीचे पुरावे जोडणे आवश्यक आहे. | |

वरिल सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने आणि स्वसाक्षांकित असणे आवश्यक आहे. तसेच तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर मागणी केल्यास सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे बंधनकारक राहील अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

वरील Annexure–A नुसार तक्त्यातील दस्तावेजांना पृष्ठनिहाय अनुक्रमांक देऊन, तक्ता भरण्यात यावा. तक्त्यात दिलेल्या अनुक्रमांकानुसारच तक्ता व दस्तावेज त्याच क्रमाने अपलोड करणे बंधनकारक आहे.

## ANNEXURE – 'B'

### खाद्यपदार्थांची यादी

| अ. क्र. | खाद्य पदार्थ | |
|---|---|---|
| १ | १. अल्पोपहार / नाष्टा (सकाळी)<br>(पोहे/उपमा/इडली/इडली वडा/वडा सांबर/मिसळ पाव/ डोसा/उतप्पा/साबुदाना खिचडी)<br>२. पाणी जार व कागदी ग्लास | अमर्यादीत |
| | ३. चहा / कॅफी | |
| | | |
| २ | १. अल्पोपहार / नाष्टा (सायंकाळी)<br>समोसा/वडापाव/कचोरी/ व्हेज सॅन्डविच (ग्रील्ड)/ व्हेज सॅन्डविच/ | अमर्यादीत |
| | २. चहा / कॅफी | |
| | | |
| ३ | भोजन (शाकाहारी) (दुपार)<br>१.सुप (व्हेज मंच्याव/हॉट ॲन्ड सॉर/व्हेज क्लिअर/व्हेज लेमन कॉरंडॉर/इ.)<br>२.रस्सा भाजी : (एक प्रकार)<br>(पनिर मसाला/पातोडी/आलू मटर/छोले मसाला / कोफता करी/भरली वांगे/आख्खा मसूर डाळ)<br>३.सुकी भाजी :(एक प्रकार)<br>(मिक्स व्हेज/सुका बटाटा/ पिठले/ मसाला भेंडी/वांग्याचे भरीत/ व्हेज खिमा/तवा भाजी/)<br>४. भात (बासमती) :(एक प्रकार)<br>(स्टिम राईस/जिरा राईस/ व्हेज पुलाव/ मसाले भात/ व्हेज बिर्यानी)<br>५.वरणा/डाळ :(एक प्रकार)<br>(साध वरण/डाल तडका/डाल मखणी/ कढी)<br>६.चपाती / रोटी :(दोन प्रकार)<br>(चपाती/रोटी/फुलके/पुरी/ भाकरी)<br>७.गोड पदार्थ :(एक प्रकार)<br>(गुलाबजाम/गुळाची जिलेबी/पायनॅपल शिरा/ मुगाचा शिरा/रबडी/बासुंदी/ श्रीखंड)<br>८.भजी :(दोन प्रकार)<br>(कांदा/पालक/मुंग/बटाटा)<br>९.ग्रीन सलाड :<br>(टमाटा,काकडी,बिट,कांदा,कोबी)<br>१०. थंडाई :<br>(ताक / मठ्ठा)<br>११.कॉन्टीनेंटल/इंटरकॉन्टीनेंटल डिशेस (मागणी प्रमाणे)<br>१२.इतर :<br>(पापड, लोणचे, ग्रीन चटणी, खजूर चटणी) | अमर्यादीत |
| | | |
| ४ | पिण्याच्या शुध्द पाण्याचे जार व कागदी ग्लास | |
| | | |

टिपः १) आवश्यकतेनुसार पॅकिंगमध्ये भोजन पुरवठा करणेबाबत सुचित केल्यानंतर त्याप्रमाणे कंत्राटदार यांनी व्यवस्था करणे आवश्यक राहिल. पॅकिंग साहित्यासाठी लागणाऱ्या खर्चाची जबाबदारी निविदादाराची राहील. दर पूर्ण रुपयामध्ये नमूद करावे, पैशात नमूद करु नयेत.

२) **"First Internatioal Symposium on Tribal Health MUHS FIST 25 "** च्या ठिकाणी व अल्पोपहार, भोजनव्यवस्थे च्या ठिकाणी पिण्याच्या शुध्द पाण्याचे जार आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठेदाराची राहील.

३) स्वयंपाकात कढीपत्ता, कोथिंबीर इत्यादीचा योग्य वापर जरुरी आहे. ग्रेव्हीमध्ये काजूचा वापर करावा, मगज बी वापर करण्यात येऊ नये. दुपार भोजनाचा मेनू यासाठी संबंधित समिती यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

४) वरील नमूद केलेले पदार्थ हे उदाहरणदाखल दिलेले असून या व्यतिरिक्त पदार्थ आल्यास अतिथीगृह व्यवस्थापक / संबंधित अधिकारी यांना कळविण्यात यावे.

५) खाद्यपदार्थांच्या मेनूमध्ये वारंवार तेच पदार्थ बनविणे टाळावेत. पुनरावृत्ती करण्यात येऊ नये.

# ANNEXURE – 'C'

## अन्न पदार्थाचा दर्जा उत्तम प्रतिचा असावा

| | | |
|---|---|---|
| १) | तांदूळ | बासमती, कोलम, आंबेमोहर<br>(पुलाव/बिर्याणीसाठी अख्खा बासमती (एक नंबर सुगंधी) वापरणे तसेच रोजच्या वापरासाठी कोलम सुरती अख्खा साधु बासमती रोजाना/ आंबेमोहर अख्खा वापरणे) |
| २) | डाळी | तूर डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>मूग डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>हरभरा डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>मसूर डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>उडीद डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१) |
| ३) | गहू | सिहोर, एमपी लोकवन (प्राधान्य सिहोर) |
| ४) | ज्वारी | मालदांडी (एक नंबर) |
| ५) | बाजरी | देशी (एक नंबर) |
| ६) | खाण्याचे तेल | जेमिनी सनफलॉवर |
| ७) | लोणची | बेडेकर/प्रविण/केप्र/सुहाना |
| ८) | पापड | लिज्जत/प्रविण/सुहाना |
| ९) | ब्रेड | ब्रिटानिया/मॉडर्न/शक्ती/ओव्हनफ्रेश/गोल्डन |
| १०) | बटर | अमूल/ब्रिटानिया |
| ११) | जाम | मेप्रो/किसान |
| १२) | सॉस | मॅगी/किसान/वीन |
| १३) | दूध | चितळे/गोकूळ/कात्रज/गोवर्धन/अमूल |
| १४) | चहा | ताजमहल/लिप्टन/सोसायटी/ब्रुक बॉन्ड रेड लेबल |
| १५) | कॉफी | नेसकॉफी/ब्रु |
| १६) | बिस्किट (वेगवेगळया प्रकाराची) | अ) ब्रिटानीया मारी गोल्ड/ न्युट्री चॉईस / नाईस/प्रिया मारी गोल्ड<br>ब) खारी बिस्किट (५०:५०/ मोनॅको/क्रॅकजॅक,इ)<br>क) क्रिम बिस्किट-ऑरेंज क्रिम/बॉर्नबॉन/ओरिओ/हाईड ॲन्ड सिक<br>ड) गूड डे |
| १७) | कुकीज | मागणीनुसार |
| १८) | मसाला | प्रविण/एवरेस्ट/बेडेकर/केप्र/बादशाहा |
| १९) | फळे | चांगल्या दर्जाचे(दररोज खरेदी) |
| २०) | पालेभाज्या | चांगल्या दर्जाचे(दररोज खरेदी) |

शिजवलेल्या अन्नाची तपासणी समितीमार्फत कधीही केली जाईल आणि त्यामध्ये त्यांच्या सूचनेनुसार बदल करावा लागेल.

# ANNEXURE – 'D'

निविदाधारक विषयी माहीती (फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर द्यावी)

| अ. क्र. | तपशिल / कागदपत्रांचे नाव | माहीती |
|---|---|---|
| १. | निविदाधारकाचे नाव | |
| | संस्थेचे नाव | |
| | पत्ता | |
| | दुरध्वनी क्रमांक / मोबाईल नंबर | |
| | ई–मेल आयडी | |
| २. | भागिदारी असल्यास भागिदाराचे नांव | |
| | संस्थेचे नाव | |
| | पत्ता | |
| | दुरध्वनी क्रमांक / मोबाईल नंबर | |
| | ई–मेल आयडी | |
| ३. | निविदा स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे नांव हुद्दा | |
| ४. | संस्थेचा प्रकार (मालक/भागीदारी/प्रा.लि./सार्वजनिक उद्योग/शासकीय/शासन अंगीकृत संस्था) | |
| ५. | स्थापना वर्ष आणि व्यावसायिक अनुभव (एकूण संख्या) | |
| ६. | पॅन नंबर | |
| ७. | बॅंक खात्याचा तपशिल खाते नांव | |
| | खाते क्रमांक | |
| | बॅंकेचे नाव पत्ता | |
| | IFSC Coe | |
| | MICR Code | |
| ८. | GST नोंदणी क्रमांक | |
| ९. | मागील पाच वर्षात निविदा धारकावरील कोर्ट केसेसचा तपशिल | |
| १०. | मागील पाच वर्षात कार्यादेश रद्दबातल झाले असल्यास त्याबाबतचा तपशिल | |
| ११. | निविदेवर कोणत्या अधिकारात स्वाक्षरी केली ? (मालक/अधिकृत भागीदार/अधिकृत संचालक) | |

# ANNEXURE – 'E'

सीएचे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र

खालील वर्षापैकी कोणत्याही सलग तीन वर्षाची कॅटरींग उद्योगाची वार्षिक उलाढाल प्रत्येकी किमान रु.१० लाख असल्याचे प्रमाणप्रत्र.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष (मागील तीन वर्ष) | वर्षिक उलाढाल रुपये |
|---|---|---|
| १. | २०२० –२०२१ | |
| २. | २०२१ –२०२२ | |
| ३. | २०२२ –२०२३ | |
| ४. | २०२३ –२०२४ | |

स्वाक्षरी आणि शिक्का
चार्टर्ड अकौंटंट

स्वाक्षरी व शिक्का
निविदाधारक/अधिकृत प्रतिनिधी

## ANNEXURE – 'F'

मी.........................................पदनाम.........वय.. .....   राहणार......................
...........  संस्थेचे नावं व पत्ता.............................................................................
................खालीलप्रमाणे प्रतिज्ञा करतो की,

१. माझ्या फर्म / कंपनीचे कोणत्याही व्यक्ती सोबत कोणत्याही प्रकारची भागीदारी / शेअर किंवा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष संबध नाही.

२. माझी फर्म / कंपनी दिवाळखोर म्हणुन घोषित झालेली नाही.

३. माझ्या फर्म / कंपनीने अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

४. माझ्या फर्म /कंपनीने कोणतेही गैरकृत्य करुन किंवा नैतिक अधःपतनाचे कोणतेही कृत्य केलेले नाही.

५. माझ्या फर्म / कंपनीने कोणेतेही गुन्हेगारी कृत्य केलेले नाही. तसेच कंपनीविरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल  झालेला नाही.

६. माझ्या फर्म / कंपनीने आयकर / विक्रीकर व फेरा इ. कायद्याचे उल्लंघन केलेले नाही.त्याबाबत माझ्या माझ्या फर्म / कंपनीविरुध्द खटला किंवा दावा दाखल झालेला नाही.

७. माझ्य फर्म / कंपनीला शासकीय / स्थानिक संस्था यांनी काळया यादीत टाकलेले नाही.

८. माझ्या फर्म / कंपनीला................संस्थेने...../.../...ते..../..../.... या कालावधीसाठी काळया यादीत टाकले होते.सदर कालावधी संपला असल्याने माझ्या कंपनी फर्म/निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र आहे.

९. माझ्या फर्म / कंपनीला सेवेच्या स्वरुप व व्याप्ती दिल्याप्रमाणे तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे सेवेचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रदद केल्लास माझी माझ्या फर्म / कंपनी सदर ठिकाणी पुरविलेल्या आवश्यक सेवेसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

१०. पात्रतेबाबतचे दाखल केलेले कागदपत्रे सर्व खरी आहेत.त्यात काही फसवेगिरी आढळुन आल्यास किंवा तसे करार काळात आढळुन आल्यास माझी माझ्या फर्म / कंपनी त्यासाठी जबाबदार राहु व पात्र ठरु व माझी माझ्या फर्म / कंपनी अशा परिस्थितीत कोणतीही नोटीस न देता पुरविण्यात आलेली सेवा रद्द करण्याचा व कार्यालयाकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा विद्यापीठास अधिकार राहील व ते मला मान्य राहील.

निविदा धारकाची नाव व सही.........
पत्ता....................................
दुरध्वनी क्रमांक......................
मोबाईल क्रमांक...............
दिनांक........

## ANNEXURE – 'G'

# स्वयंघोषणापत्र

प्रमाणित करण्यास येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, विभागीय केंद्र नागपूर यांनी केटरींग सेवा पुरवठा सेवेविषयी घालुन दिलेल्या अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असुन मला / आम्हाला हा ठेका मिळाल्यास ई–निविदेतील व करारातील अटी व शर्तीची पूर्तता करण्याची जबाबदारी माझ्यावर / आमच्यावर असुन त्या माझ्यावर / आमच्यावर बंधनकारक राहतील. वरील अटी व शर्तीचा जर माझ्या /आमच्या कडुन भंग झाला तर माझी / आमची अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार "आयोजन सचिव, एमयुएचएच फिस्ट–२५, मआविवि विभागीय केंद्र, नागपूर" यांना राहील. तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देखील करण्यास मी / आम्ही जबाबदार असू. तसेच सेवेचा कालावधी संपल्यानंतर लक्षात आल्यास तसेच शासकीय नियमांचे कायद्याचे पालन न झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी माझी/आमची राहील.

ठिकाणः

निविदाधारकाचे नाव व सही.............

पत्ता.....................................

दिनांकः

दुरध्वनी /मोबाईल क्रमांक................

# ANNEXURE – 'H'

## Format For submitting Present Client List
## (For three years of F.Y. 2020-2021, 2021-2022 & 2022-23)

| No | Name of the Clients, Address and Contact No. | Duration Of Contract | Type of Service Provided | Catering Services Provided on monthly average basis (No.of persons) |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |

In respect of clause No.1, The bidder shall provide copy of work order /certificate in the same sequence as per mentioned In the above chart. The same shall be verified before award of contract.

**Orgnizing Secretory**
**MUHS FIST-25,**
**MUHS Regional Centre, Nagpur**

**I / We have read all above terms & conditions and here by accept and undertake to be binding to it.**

**Place :- Nagpur** **Date :-**